# दैनिक विवेक सिंधु



बीड जिल्हा | शुक्रवार, दि.04 सप्टेंबर 2026 | viveksindhu@gmail.com | वर्ष 46 वे | अंक क्र.135 | पाने 4 | किंमत : 2 रु. | www. viveksindhu.com


## अंबाजोगाई, केज शहरात कडकडीत बंद

### मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला दिला पाठिंबा



अंबाजोगाई: मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी येथे उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावल्याच्या पार्श्वभूमीवर, गुरुवारी अंबाजोगाई आणि केज शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला.

उपोषणाला जाहीर पाठिंबा दर्शवण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने शहरातून दुचाकी रॅली काढण्यात आली, तसेच प्रशासनाला मागण्यांचे निवेदन सादर करून तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.

पान 3 वर

### मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर सरकारचा मोठा निर्णय

## 10 ते 17 सप्टेंबरदरम्यान मंडळ स्तरावर कुणबी प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिरे

छत्रपती संभाजीनगर – मराठा आरक्षणाच्या मागणीवरून मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू असतानाच सरकारने कुणबी, मराठा कुणबी आणि कुणबी मराठा समाजातील पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्र मिळवून देण्याच्या प्रक्रियेला वेग देण्यासाठी मोठी प्रशासकीय मोहीम हाती घेतली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील 8 जिल्ह्यांमध्ये 10 ते 17 सप्टेंबरदरम्यान मंडळ स्तरावर विशेष शिबिरे घेण्याचे आदेश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.



या विशेष मोहिमेत जुन्या कुणबी नोंदी शोधणे, उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी करणे, अर्ज स्वीकारणे आणि पात्र लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही जलदगतीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जात प्रमाणपत्रासोबतच जात पडताळणी

पान 3 वर

## आंतरवलीत आंदोलकाचा हृदयविकाराने मृत्यु



धारूर – मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जरांगे यांच्या सुरू असलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आंतरवली सराटी येथे गेलेल्या धारूर तालुक्यातील संगम येथील दशरथ शिवाजी रायकर (वय ४०) या आंदोलकाचा गुरुवार (दि. ३) रोजी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने मृत्यु झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेने संगम परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

दशरथ रायकर हे आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आंतरवली सराटी येथे गेले होते. गुरुवारी पहाटे तीन ते सहा वाजण्याच्या दरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याचे सांगण्यात येत आहे. त्यानंतर त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्याची प्रक्रिया करण्यात आली. पुढील वैद्यकीय तपासणीसाठी त्यांना उपजिल्हा रुग्णालय,अंबड येथे पाठविण्यात आले आहे. त्यांच्या मृत्युचे नेमके कारण वैद्यकीय तपासणीनंतर स्पष्ट होणार आहे.रायकर यांच्या निधनाची बातमी समजताच संगम गावासह धारूर तालुक्यात शोककळा पसरली.आंदोलनासाठी गेलेल्या एका बांधवाचा मृत्यु झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.या घटनेमुळे आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सामान्य कुटुंबांमध्येही चिंता व्यक्त होत आहे. रायकर यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक व मित्रपरिवार असा परिवार आहे.

## कोर्ट सुरू असतानाच अंबाजोगाईच्या अतिरिक्त सत्र न्यायाधीशांना सक्तीची सेवानिवृत्ती

अंबाजोगाई: येथील जिल्हा व सत्र न्यायालयात न्यायालयीन कामकाज सुरू असतानाच अतिरिक्त सत्र न्यायाधीश डॉ. रचना तेहरा यांना गुरुवारी सक्तीची सेवानिवृत्ती देण्यात आली. मुंबई उच्च न्यायालयाच्या थेट निर्देशानुसार बीडच्या प्रमुख जिल्हा न्यायाधीशांच्या पथकाने न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून या आदेशाची अंमलबजावणी केली. प्रत्यक्ष कामकाज सुरू असतानाच झालेल्या या अचानक कारवाईमुळे संपूर्ण न्यायालयीन आणि विधी वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.



न्यायालयीन कार्यपद्धतीत न्यायालयीन शुचिता राखण्याच्या उद्देशाने अपवादात्मक स्थितीत अशा प्रकारची कारवाई केली जाते. गुरुवारी सकाळच्या सत्रात डॉ. रचना तेहरा यांनी आगामी राष्ट्रीय लोकअदालतीच्या पूर्वतयारीसाठी सर्व न्यायाधीश, भूसंपादन अधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक घेतली होती. ही बैठक संपवून त्या आपल्या नेहमीच्या कामकाजासाठी न्यायालयात बसल्या असता, बीडहून आलेल्या प्रमुख जिल्हा न्यायाधीशांच्या पथकाने त्यांच्या दालनात जाऊन थेट सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या आदेशांची अंमलबजावणी केली.

या नाट्यमय घडामोडीमुळे अंबाजोगाई न्यायालयातील १५ वर्षांपूर्वीच्या कटू आठवणी पुन्हा ताज्या झाल्या आहेत. ज्या दालनात डॉ. तेहरा यांच्यावर ही कारवाई झाली, त्याच कक्षात सुमारे दीड दशकापूर्वी तत्कालीन अतिरिक्त सत्र न्यायाधीशांवरही अशाच प्रकारे सक्तीच्या सेवानिवृत्तीची कारवाई करण्यात आली होती. एकाच कक्षात घडलेल्या या पुनरावृत्तीमुळे स्थानिक वकिलांमध्ये आणि प्रशासकीय वर्तुळात दिवसभर या कारवाईची चर्चा सुरू होती.

## बीडमध्ये कुंटणखान्यावर पोलिसांचा छापा

### » एका पीडित महिलेची सुटका तर तिघांना अटक

बीड: बीड शहरातील जवाहर कॉलनी परिसरात सुरू असलेल्या एका अनैतिक कुंटणखान्यावर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत छापा टाकला आहे. या कारवाईत एका पीडित महिलेची सुटका करण्यात आली असून तीन मुख्य आरोपींना रंगेहात अटक करण्यात आली आहे.

जवाहर कॉलनीतील चंपावती शाळेच्या मागे भक्ती कन्स्ट्रक्शन रोड परिसरात बाहेरून महिला बोलावून वेश्याव्यवसाय चालवला जात असल्याची गोपनीय माहिती



पोलिसांना मिळाली होती. या

पान 3 वर

## एलपीजी सिलिंडर रिफिलिंगची मर्यादा 30 दिवसांवर आणा

### खा.बजरंग सोनवणे यांची केंद्रीय पेट्रोलियम मंत्र्यांकडे मागणी

बीड: बीड जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील हजारो कुटुंबांना भेडसावणारी घरगुती एलपीजी सिलिंडरची टंचाई दूर करण्यासाठी रिफिलिंगचा कालावधी ४५ दिवसांवरून ३० दिवसांवर आणण्यात यावा, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. पत्रात



म्हटले आहे, सध्या लागू असलेल्या नियमांनुसार ग्राहकांना दुसरा सिलिंडर बुक करण्यासाठी ४५ दिवस वाट पाहावी लागते. मात्र, घरातील सदस्यांची संख्या आणि रोजची गरज यानुसार अनेक कुटुंबांचा सिलिंडर ४५ दिवस पूर्ण होण्याआधीच संपतो. परिणामी, पुढील बुकिंगची मुदत पूर्ण होईपर्यंत नागरिकांना सिलिंडरशिवाय प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. ४५ दिवसांची एकसमान मर्यादा सर्वच कुटुंबांसाठी

पान 3 वर

## केज पोलिसांची अवैध दारू विक्री विरुद्ध कारवाई

केजः– केज पोलिसांनी नांदुरघाट दूर क्षेत्र चौकी अंतर्गत असलेल्या मुंडेवाडी येथील अवैध्य दारू विक्री विरुद्ध कारवाई करून मुद्देमालासह दारू बाळगून विक्री करणाऱ्या एकाला ताब्यात घेत कारवाई केली.

दि. २ सप्टेंबर रोजी केज पोलिस ठाणे हद्दीतील नांदुरघाट दूर क्षेत्र पोलिस चौकीच्या हद्दीत असलेल्या मुंडेवाडी येथे नवनाथ गहिनीनाथ घोळवे हा अवैधरित्या व बेकायदेशीरपणे देशी दारू विक्री करीत असल्याची गुप्त माहिती पोलिस निरीक्षक राहुल सूर्यतळ आणि नांदुरघाट पोलिस



चौकीचे सहाय्यक पोलिस निरीक्षक महेश क्षीरसागर यांना मिळाली. माहिती मिळताच त्यांनी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब बांगर यांना कारवाईचे आदेश दिले. त्या नुसार सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब बांगर आणि त्यांचे सहकारी पोलीस हेडकॉन्स्टेबल राजू वंजारे, शेख पाशा यांनी सदर ठिकाणी छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी अवैध्य व चोरटी दारू विक्री करीत असलेल्या नवनाथ घोळवे याला ताब्यात घेवून त्यांच्या ताब्यातील अवैध्य विक्री करण्यासाठी ठेवलेला २ हजार ४० रु. चा देशी दारूचा मुद्देमाल ताब्यात घेतला.

या प्रकरणी नवनाथ घोळवे याच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात महाराष्ट्र दारू बंदी कायदा ६५(इ) नुसार कारवाई करण्यात आली आहे.

## जिल्ह्यावर भीषण दुष्काळाचे सावट; ऑगस्टमध्ये केवळ दोनच दिवस पाऊस, धरणांत उरले अवघे 16.30% पाणी

बीड – पावसाळ्याचे तीन महिने उलटून गेले तरी बीड जिल्ह्यात वरुणराजाने ओढ दिल्याने संपूर्ण जिल्ह्यावर भीषण दुष्काळाचे आणि पाणीटंचाईचे गडद संकट ओढवले आहे. ऑगस्ट २०२६ मध्ये अवघ्या २५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून, गेल्या पाच वर्षांच्या तुलनेत या महिन्यात केवळ दोनच दिवस पाऊस बरसला आहे. परिणामी, जिल्ह्यातील १६४ सिंचन प्रकल्पांमध्ये आता केवळ १६.३० टक्केच उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिल्याने नागरिकांची चिंता वाढली आहे.

३१ ऑगस्टपर्यंत जिल्ह्यात सरासरीच्या केवळ ५०.३ टक्के पावसाची नोंद झाली आहे. सध्या तीव्र पाणीटंचाईमुळे २० गावे आणि २५ वाड्यांमधील तब्बल ८४,२२७ नागरिकांची तहान भागवण्यासाठी ५४ खाजगी टँकर्स सुरू करण्यात आले आहेत. सप्टेंबर महिन्यात दमदार पाऊस न झाल्यास पिण्याच्या पाण्याचा अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण होईल, तसेच खरीप आणि रब्बी हंगामातील पिकांचेही मोठे नुकसान होईल. गेवराई, आष्टी आणि वडवणी या तालुक्यांमध्ये पावसाची अवस्था अत्यंत दयनीय आहे. वाढती टंचाई आणि कोरडे पडलेले जलस्त्रोत पाहता प्रशासनासमोर आता चारा छावण्या आणि पिण्याच्या पाण्याचे आपत्कालीन नियोजन करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.



# चला, श्रीकृष्ण होऊया...!

शीर्षक वाचून आश्चर्य वाटले असेल ना? होय वाटायलाच हवं. याचे कारण म्हणजे आपण आपले महापुरुष किती छोट्या कल्पनेत बंदिस्त केले आहेत? जो व्यक्ती आपल्यापेक्षा कितीतरी खडतर परिस्थितीत जन्मला, वाढला, जगला त्याला आपण अनेक अशोभनीय मिथकात अडकवून टाकले आहे असे वाटत नाही का? सज्जनहो, इतिहासाचे संदर्भ जरा लक्षपूर्वक पहा. श्रीकृष्ण कोण? कसा जन्मला? काय कामगिरी? वचनातून जीवनाचे अनमोल तत्वज्ञान सांगितले? शेवटी मृत्यू कसा झाला? या प्रश्नांची उत्तरे शोधा म्हणजे महापुरुष, क्षत्रिय राजपुत्र श्रीकृष्णाविषयी बऱ्याच बाबी स्पष्ट होतील.

क्षत्रिय, यादव कुळातील श्री कृष्ण हे वसुदेव-देवकी या राजघराण्यातील दांपत्याचे आठवे सुपुत्र! तुरुंगात जन्मल्यानंतर रातोरात वडिलांनी श्रीकृष्णाला मावशीकडे सुपूर्द केले. तिथे त्यांचे पालनपोषण श्री नंद राजांकडे झाले. त्यानंतर गोकुळात अगदी तारुण्यात युद्ध लढतांना जे लोक गाई, गुरे, निसर्ग, पर्वतांचे अर्थात पर्यावरणाचे शत्रू होते त्यांना नामोहरम करून धडा शिकवला. निसर्ग आणि प्राणीमात्रांचे रक्षण करून आपला शेतकरी कृषीधर्म निभावला. त्यातूनच श्रीकृष्ण एक मजबूत, लढाऊ युवक म्हणून समोर आले. त्यात महाबळ भटजीचे पंचांग फाडून, जाणवे तोडून थोतांड, कर्मकांडाला समाजातून पिटाळून लावले. यमुना नदी आणि गोवर्धन पर्वताची पूजा करून निसर्ग हाच आपला खरा, जिवंत ईश्वर आहे हे गोकुळातील कृषकांना पटवून दिले. हे सर्व करतांना श्रीकृष्ण अठरापगड जातीतील गोर-गरीब गुराखी सवंगड्यांना सोबत घेऊन गाई-गुरे सांभाळून गोसेवा केली. त्यात कळस म्हणजे सर्व गुरख्यांच्या शिदोऱ्या अर्थात भाजी-भाकरी एकत्र करून त्यांच्या सोबत एकत्र बसून त्यांनी सामुहिक भोजन केले. जात, वर्ण, गरीब, श्रीमंत हा भेद मिटवून पहिला



गोपाळ काला करून सर्व जात, धर्म, पंथात सामाजिक ऐक्य घडवून आणले. खऱ्या अर्थाने श्रीकृष्ण स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मानवी मुल्ये कृतीतून रुजवून सामाजिक क्रांती करणारे पहिले कृतीशील युवायोद्धा, महापुरुष! याशिवाय गोकुळात गवळणींसोबत प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, सौहार्दाचे संबंध प्रस्थापित करून घराघरांत लोकांना प्रेम करायला प्रवृत्त केले. माणसांना जिंकायचे असेल तर शक्ती, शस्त्र अथवा शास्त्राची गरज नसून केवळ निखळ, निरपेक्ष

प्रेमाचा वर्षाव केल्यास माणसं माणसांवर जीवापाड प्रेम करतात हे सिद्ध केले! प्रेमासाठी वय, गरीब, श्रीमंत, उच्च, नीच असा कोणताही भेद करण्याची गरज नाही अर्थात जगाला प्रेम अर्पावे हे ब्रीद श्रीकृष्णाने समाजाला कृतीतून दाखवून दिले.

श्रीकृष्ण जीवनाचा दुसरा टप्पा म्हणजे सत्तेने उन्मत्त, हुकुमशाही वृत्तीने वागणाऱ्या मथुरेचा राजा कंस मामाचा वध करून लोकशाही पुनर्स्थापित करण्याचे न्याय कार्य युवायोद्धा राजपुत्र श्रीकृष्ण करतात. याच टप्प्यात श्रीकृष्णाने आपल्या आत्याची मुले अर्थात पांडवांना सर्वार्थाने मदत केली. कुरुक्षेत्रावरील युद्ध आरंभ होण्यापूर्वी कौरव-पांडवांमध्ये न्यायपूर्ण शिष्टाई करण्याचे बौद्धिक, राजनीतिक, कुशल कार्य केले. त्यात कौरव, विशेषतः दुर्योधन-दुःशासन सत्तेने उन्मत्त झाल्यामुळे त्यांनी श्रीकृष्ण शिष्टाई धुडकावून लावली. त्यानंतर मोठ्या बुद्धी चातुर्याने, युद्धकुशल, धूर्त नीतीने विविध डावपेचातून कौरवांना पराभूत केले. सत्याचा विजय झाला! दरम्यान अठरा दिवसाच्या युद्धात श्रीमद्भगवद्गीता ग्रंथातून अत्यंत मोलाचे तत्वज्ञान सांगितले.

कालौघात श्रीकृष्णाच्या श्रीमद्भगवद्गीतेत त्यांना अमान्य असलेले अनेक क्षेपक श्लोक घुसडले गेले असावेत. असं असलं तरी एका युवा, अनुभवी क्षत्रियाने गीतेतून जगाला अनंत वचने दिली आहेत. भारतवर्षाला गीता हे एका युवायोद्धा श्रीकृष्णाचे सर्वात मोठे योगदान आहे हे विसरून चालणार नाही! पुढे तेराव्या शतकात याच गीतेचा प्राकृतमध्ये अनुवाद करून संत ज्ञानदेव बहुश्रुत झाले. अर्थात ज्ञानेश्वरी हे कृष्णाच्या क्रांतीतून जन्मलेले दुसरे क्रांतिकारी बीज!

श्रीकृष्ण गीतेचे तत्वज्ञान मानवाला सडेतोड, विज्ञाननिष्ठ आणि नित्य पथदर्शी आहे. सर्व प्राणीमात्रात, चराचरात ईश्वर आहे. माणसाचे शरीर मरते, उर्जा (कुणी आत्मा संबोधते) अमर आहे. ज्ञान प्राप्त होणे म्हणजे माणसाचे सर्व शुल्लक, आशावादी भ्रम दूर होऊन हे सर्वकाही नाश पावणार आहे. संयम ठेवा, जीवनात इप्सित ध्येय्य साध्य करण्यासाठी खडतर प्रसंगातून जावेच लागते. माणसाचे मन निर्मळ असणे आणि हृदयात सर्वांविषयी ओतप्रोत प्रेम असणे म्हणजे खरा धर्म! राग, द्वेष माणसाची बुद्धी नष्ट करतो. विश्वासातूनच माणसाचे जीवन घडते. विनयशीलता हा विद्वानाचा दागिना आहे. शरीर पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू, आकाश या तत्वांपासून बनले असून शेवटी ते त्या तत्वांना मिळते. काल, आज आणि उद्या जे झाले ते योग्यच झाले. वासना, क्रोध आणि लालच ही तीन नरकाची द्वारे आहेत. नित्य संशयात जगणारा माणूस कधीही प्रसन्न, शांत, आनंदी राहूच शकत नाही. वेळेसोबत चला, परिवर्तन जीवनाचा नियम आहे. मन:शांती एवढी अनमोल संपत्ती जगात नाही. नित्य कार्यमग्न असावे, कार्यातच ईश्वर आहे. ज्याचे मन अनियंत्रित आहे, त्याला बाहेरील शत्रूंची गरज नाही. महान तत्ववेत्ता श्रीकृष्ण यांनी गीतेतून अशी शेकडो अनमोल वचने सांगून जीवनाला सरळमार्गी, आनंदी जगण्याचे मार्ग सांगतांना सृष्टीला नियंत्रणात करण्याचा प्रयत्न अथवा विचार करण्यापेक्षा स्वतःला नियंत्रित करणे हेच महान कार्य आहे हे पटवून दिले.

याशिवाय श्रीकृष्ण जेंव्हा द्वारकेचे राजे होतात तेंव्हा शेजारील राजकन्यांशी विवाह करून सौहार्दाचे संबंध प्रस्थापित करतात. शिवाय आपल्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या प्रेयशीला पळवून आणून अंतर्जातीय विवाह करून समाजाला प्रेम विवाह करण्याचे दाखवून देतात. स्वतः राजा असतांना आपला मित्र सुदामाला मदत करून मित्र कसा असावा? हे पटवून देतात. याशिवाय आपसांत युद्धाने त्यांच्या वंशाचा नाश होतो हे त्यांनीच सांगून दिले आहे. श्रीकृष्णाचा शेवट म्हणजे एका पारध्याच्या बाणाने ते निर्वाण पावतात, म्हणजेच आपण आयुष्यभर केलेल्या चुकांचे फळ त्यानाही भोगावेच लागते हे ते जगाला दाखवून देतात.

वाचक माय-बापहो, स्वतः जगून जगाला अनमोल धडे, एवढे मोठे तत्वज्ञान सांगण्याचे महत्कार्य ज्या महापुरुष श्रीकृष्णाने केले असतांना अनेक पोटभरू बुवा, थोतांड भाकड कथा सांगणारे बहुरूपी बाबा या लोकराजा श्रीकृष्णाला स्त्रीलंपट, थोतांड, बाष्कळ भाकड कथांमध्ये अडकवून भोळ्या भाबड्या लोकांना, स्त्रियांना गोड गायन करून, भावनिक करून फसवण्याचे काम करतात.

हा एका महान क्षत्रिय, कृतीशील राजाचा अपमान नाही का? त्यासाठी आज आपण आपल्या महापुरुषांविषयी जागे होण्याची वेळ आहे.

याशिवाय आपण स्वतः श्रीकृष्ण यांचे अनमोल जीवन, तत्वज्ञान आणि दाखले जीवनात रुजवणे काळाची गरज आहे. आज माणसामाणसात संवादाविना दरी निर्माण होत आहे. दुसरीकडे पायांवर सर्व सुविधा लोळण घेत असतांना बदल न होणाऱ्या कालच्या विचाराने आणि अनिश्चित उद्याच्या चिंतेने आपले मन ग्रासले आहे. आज श्रीकृष्ण जयंतीचा आपण उपवासही केला असेल. सगळीकडे मोठ्या जल्लोषात उत्सवही साजरा होत असतांना खऱ्या अर्थाने आज प्रत्येकाने श्रीकृष्णाचे जीवन, तत्वज्ञान अंगीकारून आपले, घर, भोवताल शांत, आनंदी, चिंतनशील करण्याची नितांत गरज बनली आहे. तेंव्हा चला, श्रीकृष्ण होऊया, जीवन मोरपंखी करूया! जय श्रीकृष्ण!

प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ
मो.९१५८०६४०६८

## पावसाअभावी सोयाबीनसह... पान ४ वरून

करून पिकांची चांगली उगवण झाली होती. मात्र, त्यानंतर पावसाने पाठ फिरवल्याने पिकांना आवश्यक ओलावा मिळाला नाही. परिणामी सुरुवातीला जोमाने वाढणारी पिके आता उन्हाच्या तीव्रतेने आणि पाण्याअभावी करपू लागली आहेत. शेतकऱ्यांनी बियाणे, खते, औषधांची फवारणी, मशागत व पेरणी यासाठी मोठा खर्च केला आहे. मात्र, ऐन पिकांच्या वाढीच्या काळात पावसाने दडी मारल्याने केलेला खर्चही वसूल होण्याची शक्यता कमी झाली आहे. हातातोंडाशी आलेला खरीप हंगाम पावसाअभावी वाया जाण्याची भीती निर्माण झाल्याने शेतकरी हतबल झाला आहे.

धारूर, पांगरी, आवरगाव, गोपाळपूर, अंजनडोह, रुई-धारूर, पिंपळवाडा, चोरंबा, अरणवाडी, आंबेवडगाव, पहाडी, पारगाव यासह तालुक्यातील विविध गावांमध्ये पिकांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. अनेक शेतांमध्ये सोयाबीनची पाने पिवळी पडून झाडे सुकत आहेत, तर कापूस पिकाचीही वाढ खुंटली आहे. प्रशासनाने तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून प्रशासनाने तालुक्यातील पिकांची तातडीने पाहणी करून वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या निकषानुसार तातडीने मदत व दिलासा मिळावा, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

धारूर तालुक्यात पावसाने दांडी मारल्याने जोमात आलेली सोयाबीन कापूससह इतर पिकांची राख रांगोळी झाली आहे. शेतकरी बांधवाने बी-बियाणे मशागत फवारणीवर खर्च केला पण केलेला खर्च, मेहनत सगळीच वाया जात आहे शेतकरी हवालदिल झाला आहे. आर्थिक, मानसिक ताणामध्ये शेतकरी जगत आहे. प्रशासनाने तत्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्याला आर्थिक दिलासा द्यावा तसेच यावर्षीचा पीकविमा तत्काळ शेतकऱ्याच्या खात्यात जमा करावा. कर्जमाफी केलेली तत्काळ शेतकऱ्याच्या खात्यात वर्ग करून नवीन पीक कर्ज द्यावे, अशी मागणी पांगरी येथील शेतकरी राम थोरात यांनी केली आहे.

## केज उपजिल्हा रुग्णालयात राष्ट्रीय पोषण माहचे उद्घाटन

### उत्तम आरोग्यासाठी आहारात पालेभाज्यांचा समावेश आवश्यक : डॉ.इंगोले

केज – रुग्णालयात केज येथील उपजिल्हा रुग्णालयात त राष्ट्रीय पोषण माहचे उद्घाटन बुधवार रोजी झाले. रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ केशव इंगोले यांनी उद्घाटन करून मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना ते म्हणाले उत्तम आरोग्यासाठी आहारात पालेभाज्यांचा अधिक समावेश करावा असे मत डॉ इंगोले यांनी व्यक्त केले.



आहारतज्ञ सुलक्षणा पाटील यांनी आहार प्रदर्शनी मांडणी केली. प्रदर्शनामध्ये आहाराविषयीचे मार्गदर्शन करणारे वेगवेगळे मॉडेल्स ठेवण्यात आले .गरोदर माता स्तनदा माता यांनी कसा आहार घ्यावा डायबिटीज किंवा इतर रुग्णांनी कसा आहार घ्यावा आपल्या सांड पाण्यातून कशी परसबाग फुलवावी त्याचप्रमाणे कोणत्या पदार्थातून कोणती पोषक तत्वे मिळतात याबाबत चार्ट लावण्यात आले. समतोल आहार कसा असावा याविषयी प्रदर्शनात येणाऱ्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी डॉ सावंत बालासाहेब डॉ पाटील अजय डॉ श्रीमती नेहरकर, श्री सानप प्रशासकीय अधिकारी, श्रीमती पळशीकर मॅडम मॅटर, श्रीकृष्ण नागरगोजे रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी श्री यादव विजय,श्री बळीराम शिंदे व श्रीमती क्षीरसागर व श्रीमती जगताप व श्रीमती वाघमारे ,श्रीमती साळवे , श्रीमती जोगदंड , श्रीमती चव्हाण , श्रीमती भोपळे, श्रीमती कराड , श्रीमती जोशना केवटे , जयश्री लाटे,सीता गिरी, तानाजी तपसे आरोग्य विभागातील कर्मचारी, महिला,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## केजच्या सावळेश्वर-आवसगाव.... पान ४ वरून

योजनेअंतर्गत केज तालुक्यातील राज्य मार्ग क्र. ६४ सावळेश्वर ते आवसगाव इजिमा-१३३ या ५.६० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे सुधारणा काम हे पॅकेज क्र. एडीबीबीईई – आयआय – ०७ अंतर्गत ३८८.०६५ लाख रुपयांच्या निधीतून करण्यात आले असून हे काम २८ नोव्हेंबर २०२३ सुरू करून २३ ऑगस्ट २०२५ पूर्ण करण्यात आले आहे. सदरील काम धाराशिवच्या सिद्धेश्वर कन्स्ट्रक्शनमार्फत करण्यात आले होते. सदरचा रस्त्याचे काम वर्षभरात उखडून चालल्याने या रस्त्याच्या कामाच्या गुणवत्तेबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. रस्त्यावर वापरण्यात आलेले साहित्य, डांबरीकरणाची जाडी, रस्त्याची मजबुती तसेच कामाच्या तांत्रिक निकषांचे पालन झाले आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीतून काम होऊनही रस्ता अल्पावधीत खराब होत असेल, तर संबंधित यंत्रणेने याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक गुणवत्ता नियंत्रण पथकाने केली तपासणी जिल्हाधिकाऱ्यांनी दिव्य मराठीने प्रसिद्ध केलेल्या वृत्ताची दखल घेत गुणवत्ता नियंत्रण पथकास रस्त्याची पाहणी करून कामाच्या गुणवत्तेची तपासणी करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पथकाने रस्त्याची सद्यस्थिती, डांबरीकरणाची गुणवत्ता, रस्त्याची जाडी तसेच कामाच्या तांत्रिक निकषांची पूर्तता झाली आहे का, याबाबत पाहणी केली आहे. आवश्यक असल्यास रस्त्याच्या विविध ठिकाणांहून नमुने घेऊन त्यांची प्रयोगशाळेत तपासणी केली जाण्याची शक्यता आहे.

## मुलीने आरडाओरड... पान ४ वरून

आरोपी काळे याच्यावर सध्या बीडच्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.या प्रकरणी अंमळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी नवले यांच्या आदेशाने पुढील तपास पोउपनि के. के. चव्हाण तपास करीत आहेत.आरोपी बबन काळे याच्यावर यापुर्वी चोरीचा एक गुन्हा दाखल आहे. तसेच त्याने पत्नीला मारहाण केल्याचा गुन्हा देखील दाखल असून त्याची पत्नी देखील सोडून गेल्याची माहिती गावकऱ्यांनी दिली. तसेच यापूर्वी त्याने गावातील महिलांची छेडछाड केल्याचे देखील गावकऱ्यांनी सांगितले. अशा मनोविकृताविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

हे पत्रक संपादक, मुद्रक, मालक व प्रकाशक अभिजीत नानासाहेब जगताप यांनी योगेश्वरी मुद्रणालय, अंबाजोगाई येथे छापून दैनिक विवेक सिंधु कार्यालय, नगर परिषद व्यापारी संकुल (संकुल क्र.४३,४४) अंबाजोगाई पिन-४३१५१७ जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले आहे. संस्थापक संपादक – प्रा.नानासाहेब गाठाळ ✻ संपादक- अभिजीत जगताप ✻ वृत्तपत्राचा नोंदणी क्र.६५७८८/८५ ✻ फोन-२४७२७०, मो :-९७६४०३३१११,९७६५५०००८८

## टी.सी.हरवला आहे

माझा विजय लक्ष्मण गोदाम, श्री.सोमेश्वर विद्यालय, मुलांचे घाटनांदुर ता. अंबाजोगाई जि.बीड या विद्यालयाचा इयत्ता १० वी नापासचा ओरीजनल टी.सी. अंबाजोगाई ते संभाजीनगर या प्रवासादरम्यान हरवला आहे. तरी ज्या कोणास सापडल्यास त्यांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**मो.-९८२३०४५७२३**

## बीडमध्ये व्यश्याव्यवसायावर... पान १ वरून

पाठवून पंचांसमक्ष छापा टाकण्यात आला. कारवाई दरम्यान रोख रक्कम, निरोध आणि वेश्याव्यवसायासाठी महिलांची ने-आण करण्यासाठी वापरली जाणारी मोटारसायकल असा एकूण ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी विष्णू लक्ष्मण शिंदे (वय ४८, रा. माळीवेस, बीड), शशिकला विष्णू धांडे (वय ६०, रा. कबाड गल्ली, बीड), आणि सचिन विष्णू धांडे (वय ३७, रा. कबाड गल्ली, बीड) यांना अटक करण्यात आली आहे. तसेच वेश्याव्यवसायासाठी जागा भाड्याने देणारे शार्दुल दिलीपराव देशपांडे (रा. जवाहर कॉलनी, बीड) यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे ठिकाण शासकीय आयटीआयपासून १०० मीटरच्या आत असल्याने अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा आणि भारतीय न्याय संहिता नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

ही कारवाई अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, परिविक्षाधीन पोलिस उपअधीक्षक पथक आणि शिवाजीनगर पोलीस ठाणे यांच्या संयुक्त पथकाने केली. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ हे करत आहेत.

## किर्तन हे प्रबोधनाचे प्रभावी... पान १ वरून

विद्यापीठ स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय बीड व मराठवाडा महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २ सप्टेंबर रोजी किर्तन कार्यशाळेचा समारोप झाला.या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. अश्विन रांजणीकर, सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ. पि.के. कुलकर्णी, आदर्शगाव वंजारवाडीचे सरपंच वैजनाथ तांदळे,प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, प्राचार्य डॉ. सुधीर देशमुख, कार्यक्रमाधिकारी डॉ. देविदास नागरगोजे, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ.रमेश खंडागळे हे उपस्थित होते. पुढे बोलताना नाना महाराज कदम म्हणाले की कीर्तनाच्या माध्यमातून समाज जोडला जातो.समाजावर योग्य संस्कार होतात. भक्त संप्रदायामध्ये जातीपातीच्या पलीकडे जाऊन संत समाज सामाजिक समरसता निर्माण करण्याचे काम करतो.समाजातील वाईट गोष्टींवर कीर्तनकार प्रहार करतो. 'नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी' याप्रमाणे कीर्तनकार समाजाला योग्य दिशा दाखवण्याचे काम करतो असे ते म्हणाले. सरपंच वैजनाथ तांदळे म्हणाले की गाव पातळीवर काम करत असताना सामुदायिक प्रयत्न महत्त्वाचे असतात. संतांनी पर्यावरणाचे महत्त्व सांगितले आहे. अध्यक्षीय समारोपात डॉ.पि.के कुलकर्णी म्हणाले की पंच परिवर्तनाच्या माध्यमातून समृद्ध समाजाची निर्मिती करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. या कार्यशाळेत दुसऱ्या सत्रात डॉ.प्रमोद कुमावत यांनी भारतीय कीर्तन परंपरा विषयावर आपले विचार मांडले. कार्यक्रम यशस्वी डॉ.रुपाली कुलकर्णी, डॉ. कृष्णा रामदासी डॉ.सोपान सुरवसे , डॉ . अशोक डोके, डॉ. अनुजा कास्तीकर, डॉ. संगीता ससाने, डॉ . दिपा देशपांडे, डॉ.सुनीता कुरुडे, डॉ. दत्ता पवार , मनोज नखाते, स्वप्नील नागरगोजे यांनी विशेष प्रयत्न केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अश्विनी देशपांडे यांनी केले. आभार डॉ.अशोक डोके यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयांतील विद्यार्थी कर्मचारी प्राध्यापक यांची उपस्थिती होती.

## सोनवळा गावात... पान ४ वरून

सहाय्यक ज्ञानोबा गंगाराम मस्के यांनी मोजमाप पुस्तिका, हजेरीपत्रके आणि इतर महत्त्वाचे अभिलेखे दडवून ठेवत शासकीय कामात अडथळा निर्माण केला. या मुजोरपणावर तीव्र संताप व्यक्त करत पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी जुलै महिन्यात मस्के यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून, दोन दिवसांत समाधानकारक खुलासा न आल्यास सेवा समाप्त करण्याचा इशारा दिला आहे. याशिवाय, ऑगस्ट महिन्याच्या २४ तारखेला पुन्हा एक आदेश काढत जिल्हा परिषदेच्या बांधकाम उपविभागाच्या अभियंत्यांसह अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष जागेवर जाऊन तीन दिवसांत सखोल चौकशी अहवाल सादर करण्याचे सक्त निर्देश देण्यात आले आहेत.

गरिबांच्या हाताला काम आणि गावाला रस्ता देण्यासाठी असलेल्या मनरेगा योजनेचा असा बाजार मांडला जाणे, हे अत्यंत क्लेशदायक आहे. नागरिकांना मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवून स्वतःचे खिसे भरणारी ही भ्रष्ट साखळी वेळीच मोडून काढणे आवश्यक आहे. चौकशी अहवाल प्राप्त होईपर्यंत या कामाचे कोणतेही देयक अदा न करण्याचे सक्त आदेश प्रशासनाने दिले असले तरी, या प्रकरणातील मुख्य सूत्रधारांवर गुन्हे दाखल होऊन जनतेच्या पैशांची वसुली होणार का, याकडे आता संपूर्ण पंचक्रोशीचे लक्ष लागून आहे.

## जाहिरनामा (प्रसिद्धीपत्र)

मौजे चनई येथील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदार श्री/श्रीमती **१) मिलींद विष्णु जोगदंड, २) अमित राहुल बनसोडे, रा. अंबाजोगाई यांनी** खरेदी खत क्रं.६५५२ दि.२५/०८/२०२६ अन्वये श्री./श्रीमती- **देवीदास नागोराव सावंत रा. अंबाजोगाई यांच्याकडून** सदर जागा घेतली आहे.

सदर जागेचे वर्णन - **घर नं.-२९१४, गट/सर्व्हे नं. २४०, प्लॉट नं. ०८**

**पुर्व-पश्चिम- १५ मी, दक्षिण-उत्तर-०९**

**एकुण क्षेत्रफळ - १३५ चौ.मी.**

**चतु:सिमा**

**पुर्वेस - ६ मी रस्ता, पश्चिमेस-कदम यांची जमीन,**
**दक्षिणेस-प्लॉट नं.०७, उत्तरेस - प्लॉट नं.०९**

येणे प्रमाणे वरील लांबी व चतु:सिमेचे आतील जागेची नोंद न.नं.८ ला करणे बाबत हा जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात येत आहे.तरी सदर नोंदीबाबत ज्या कोणास उजर असेल त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध झालेचे तारखेपासुन १५ दिवसाचे आत सदर जागेबाबत लेखी कागदपत्रासह कार्यालयीन वेळेत उजरदारी सादर करावी नसता मुदतीनंतर अर्जदाराचे नाव रितसर नं.नं.८ ला नोंद केली जाईल याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

करिता हा जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रशासक/ग्रामविकास अधिकारी**
**ग्रा.पं.कार्यालय चनई, ता. अंबाजोगाई जि.बीड.**

## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, जिल्हा व तुकडी बीड, पोटतुकडी व तालुका पंचायत समिती अंबाजोगाई नगर परिषद, अंबाजोगाई हद्दीतील न.प.मालमत्ता क्र.४-२७ जुना व ४-२६ ही मालमत्ता आमची वडिलोपार्जित मालमत्ता असून सदर मालमत्तेच्या नगर परिषद कर आकारणी अभिलेखात नारायण सोनाचार्य पुराणीत यांच्या नावाची नोंद होती. त्यांच्या मृत्यूनंतर सदर न.प.अभिलेखामध्ये मा.न्यायालयाच्या वारस प्रमाणपत्राआधारे श्रीमती कमलबाई नारायण पुराणीक, सौ.प्रभा बापुराव ब्रह्मपुरीकर, वसंत वासुदेव, श्रीराम, वामन, श्रीनिवास व अरूण सर्वांचे पिता नारायण पुराणीक यांच्या नावाची नोंद घेण्यात आली आहे.

सदरील मालमत्ता ही हिंदु एकत्रित कुटूंबाची वडिलोपार्जित मालमत्ता असून त्याची अद्याप वाटणी झालेली नाही. असे असताना आमच्या परिवारातील श्रीनिवास नारायण पुराणीक व इतर हे सदरील मालमत्ता ही आमची एकट्याची आह अशी दिशाभुल करून विक्री/हस्तांतरण करण्याच्या तयारीत आहेत. त्यांनी अनेक लोकांना सदरील मालमत्ता विक्री करायची आहे असे सांगितले देखील आहे. त्यामुळे या जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील मालमत्ता ही उपरोक्त उल्लेखीत सर्वांची असून सदर मालमत्ता कोणीही खरेदी, विकी, बक्षिस, दान, लीज, तारण अशा कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करू नये. सदर मालमत्ता कोणी खरेदी केल्यास त्याच्या कायदेशिर सर्व परिनामांची जबाबदारी संबंधीतावर राहील याची नोंद घ्यावी.

दि.०३/०९/२०२६

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **मार्फत** | **जाहिर प्रगटन देणार** |
| **ॲड.पी.पी.दहिवाळ** | **वसंत नारायणराव पुराणीक** |

## एलपीजी सिलेंडर... पान १ वरून

यासंदर्भात पेट्रोलियम मंत्रालय, संबंधित अधिकारी व एलपीजी गॅस कंपन्यांना तातडीने निर्देश द्यावेत, या निर्णयामुळे बीड जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील ग्राहकांना वेळेवर गॅस उपलब्ध होईल आणि त्यांची अडचण दूर होईल.

जनहित लक्षात घेऊन या गंभीर समस्येवर त्वरित आणि सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे.

## जाहिरनामा

**वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत**
**अंबाजोगाई येथील श्रीम.प्रियंका जे.लिगाडे, २ रे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**अंबाजोगाई यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर -५१९/२०२६**
**रूक्मीण वि.निल**

**अर्जदार - १) रूक्मीण पांडुरंग येडे, वय ७० वर्षे, धंदा- घरकाम, रा.सोमनाथ बोरगाव ता. अंबाजोगाई जि.बीड, २) हरिश्चंद्र पांडुरंग येडे, वय ५१ वर्षे, धंदा- शेती, रा.सोमनाथ बोरगाव ता. अंबाजोगाई जि.बीड, ३) दिगांबर पांडुरंग येडे, वय ४६ वर्षे, धंदा- शेती, रा.सोमनाथ बोरगांव ता. अंबाजोगाई जि.बीड, ४) देवकन्या पांडुरंग पवार, वय ४२ वर्षे, धंदा- घरकाम, रा.मुडेगाव ता. अंबाजोगाई जि.बीड.**

**विरूध्द**

**निरंक**

**अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील मयत नामे पांडुरंग बापुराव येडे हे दिनांक - १६/०४/२०२५ रोजी मयत झाले आहे. यांच्या मृत्यू पश्चात त्यांचे कायदेशिर वारस म्हणून अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामासाठी ते मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार हे मयताचे कायदेशिर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर राहून आपल्या हकरती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर कोर्ट सदरहू अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलीच पुराव घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यासत्यांना सदरहू मयताचे कायदेशिर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र देईल. त्याची पुढील तारीख - २४/०९/२०२६ नेमुण देण्यात आलेली आहे.**

**आज ता.३१ माहे ०८ सन २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिला.**

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
सहा.अधिक्षक
दि.न्यायालय क.स्तर, अंबाजोगाई

## जाहिरनामा

जन्म मृत्यूची नोंद रजिस्टरला नोंद घेणे बाबत.
मा.प्रियंका ज.लिगाडे, २ रे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अंबाजोगाई यांच्या
न्यायालयात फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक - २३३/२०२६
आमोल वि.निबंधक स्वा.रा.ती.ग्रा.शा.म.व रूग्णालय अंबाजोगाई ता. अंबाजोगाई

ज्यापेक्षा अर्जदार **अमोल विठ्ठल ढोले, वय ३५ वर्षे, धंदा- शेती रा. महाराणा प्रताप चौक, आडस, ता. केज जि.बीड यांचा मुलगी नामे आराध्या अमोल ढोले याचा/हिचा** जन्म **दिनांक - ०३/०५/२०२४ रोजी स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, अंबाजोगाई** येथील जन्म-मृत्यू रजिस्ट्ररला नोंद घेणेसाठी अर्जदाराने या न्यायालयात उपरोक्त अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू अर्जदाराच्या **मुलगी/मुलगा** यांचा जन्मदिनांकाबाबत ठिकाणाबाबत कोणास काही आक्षेप/हरकत असल्यास या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्यात आत त्याने या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असेही कळविण्यात येते की, सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास न्यायालय सदरहू अर्जदार यांना त्यांच्या **जन्माची झाल्याबाबत निबंधक, जन्म-मृत्यू नोंद विभाग, स्वा. रा.ती.ग्रा.शा.म.व.रूग्णालय अंबाजोगाई ता. अंबाजोगाई येथे रजिस्टरला घेणेबाबतचा अर्ज निकाली काढण्यात येईल.**

प्रस्तुत प्रकरणात न्यायालयाने नेमुण दिलेली -
**पुढील तारीख - ०६/१०/२०२६ अशी आहे.**

आज दिनांक - **०३/०९/२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले असे.

**शिक्का**

| | |
|---|---|
| | **आदेशावरून** |
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **कनिष्ठ लिपीक** | **सहाय्यक अधिक्षक,** |
| **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी** | **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,** |
| **कोर्ट क्रं.२ अंबाजोगाई** | **कोर्ट क्र.१, अंबाजोगाई** |

## डिग्री हरवली आहे

माझी सुहास सुंदरराव कर्वे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठाची बी.एस.सी. ची डिग्री साळुंकवाडी ते बर्दापुर या प्रवासादरम्यान हरवली आहे. तरी ज्या कोणास सापडल्यास त्यांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**मो.-८८३०६४८३५९**

## अंबाजोगाई-केज- शहरात... पान १ वरून

### अंबाजोगाईत निघाली दुचाकी रॅली

अंबाजोगाई तालुक्यातील मराठा समाजाच्या तरुणांनी एकत्र येऊन शहरातून मोठी दुचाकी रॅली काढली आणि नागरिकांना बंद पाळण्याचे आवाहन केले. या आवाहनाला शहरातील व्यापाऱ्यांनी प्रतिसाद देत कडकडीत बंद पाळला. रॅलीनंतर नगर पालिका परिसरात छोटेखानी सभा पार पडली. यावेळी आंदोलकांनी राज्य शासनाने मराठा आरक्षणाचा प्रश्न तत्काळ निकाली काढावा आणि मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सोडवावे अशी मागणी केली. संपूर्ण आंदोलना दरम्यान शहरात कुठेही अनुचित प्रकार घडला नाही. मुस्लीम समाजानेही स्वयंस्फुर्तीने दुकाने बंद ठेवत जरांगे यांच्या आंदोलनाला पाठींबा दर्शवि.

### तीव्र आंदोलन उभारण्याचा केजमध्ये इशारा

सकाळी शहरातील भवानी माता चौकात मराठा समाजातील तरुण मोठ्या संख्येने एकत्र आले. तेथून प्रमुख मार्गांवरून शांततेत दुचाकी रॅली काढत व्यापाऱ्यांना पाठिंबा देण्याचे आवाहन करण्यात आले. या हाकेला प्रतिसाद देत स्थानिक व्यापाऱ्यांनी संपूर्ण दिवसभर बाजारपेठ बंद ठेवली. रॅलीनंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात नायब तहसीलदार अशोक भंडारे यांना सकल मराठा समाजाच्या वतीने निवेदन देण्यात आले. राज्य शासनाने जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची त्वरित दखल घेऊन मराठा आरक्षणाचा प्रश्न निकाली न काढल्यास शहर आणि तालुक्यात तीव्र जनआंदोलन उभारले जाईल, असा इशारा यावेळी आंदोलकांनी दिला. दरम्यान, शहरात शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमुख चौकांमध्ये चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## रस्त्याच्या वादातून... पान ४ वरून

आई भांडण सोडवण्यासाठी मध्यस्थी करायला आली असता, लक्ष्मीने लाकडी फळीने त्यांच्या डोक्यात वार करून गंभीर जखमी केले. त्यानंतर लक्ष्मी आणि तिचा पती गौतम उत्तम चाटे या दोघांनी मिळून तक्रारदारास लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर सरस्वती चाटे यांनी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमानुसार लक्ष्मी चाटे आणि गौतम चाटे या दाम्पत्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पोलीस हवालदार वाले या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## ज्येष्ठांचा कायदा २००७... पान ४ वरून

त्यांनी दिली.संघाचे अध्यक्ष अनंतराव जगतकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास शिवाजीराव शिंदे, इंदू पोटपल्लेवार, ज्ञानोबा कुकडे, नारायणराव केंद्रे, डॉ. दामोदर थोरात, जगदीश जाजू यांच्यासह लातूर येथील प्रतिनिधी बी. आर. पाटील, प्रकाश घादगिने, रमेश भोयरेकर व प्रकाश नीला उपस्थित होते. बैठकीत रक्षाबंधन सण आणि ऑगस्ट महिन्यातील सदस्यांचा सामूहिक वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन पुष्पा बगाडे यांनी केले तर आभार जगदीश जाजू यांनी मानले.

## मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर सरकारचा... पान १ वरून

सर्वोच्च प्राधान्याची बाब असल्याचे विभागीय आयुक्तांनी स्पष्ट केले असून, कामात कोणत्याही प्रकारची हयगय खपवून घेतली जाणार नसल्याचा इशाराही देण्यात आला आहे.

### ८ जिल्ह्यांमध्ये राबवली जाणार विशेष मोहीम

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी ३ सप्टेंबर रोजी जारी केलेल्या आदेशानुसार छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर आणि धाराशिव या ८ जिल्ह्यांमध्ये विशेष शिबिरांचे आयोजन केले जाणार आहे. मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री यांनी २ सप्टेंबर रोजी दिलेल्या निर्देशांच्या आधारे ही कार्यवाही करण्यात येत आहे. प्रत्येक जिल्ह्यात पात्र नागरिकांना कुणबी, मराठा कुणबी किंवा कुणबी मराठा या नोंदींच्या आधारे जात प्रमाणपत्र मिळवताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यावर प्रशासनाचा भर राहणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात उपजिल्हाधिकारी दर्जाचा नोडल अधिकारीजात प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रमाणपत्राची प्रक्रिया अधिक गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या नोडल अधिकाऱ्याची प्रमुख जबाबदारी प्रमाणपत्र मिळवताना येणाऱ्या अडचणी दूर करणे, नागरिकांच्या तक्रारींचा दररोज आढावा घेणे आणि संबंधित विभागांमध्ये समन्वय साधणे अशी असेल. नोडल अधिकाऱ्याला तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जात पडताळणी समिती यांच्यात समन्वय ठेवावा लागणार आहे. त्याचबरोबर प्रलंबित प्रकरणांचा अहवाल प्रत्येक सोमवारी विभागीय आयुक्त कार्यालयाला सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.विशेष शिबिरांची जबाबदारी केवळ तहसील किंवा जिल्हा पातळीवर न ठेवता ती थेट मंडळ स्तरावर नेण्यात आली आहे. प्रत्येक मंडळात तलाठी, ग्रामसेवक आणि मंडळ अधिकारी यांनी संयुक्तपणे शिबिराचे आयोजन करायचे आहे. या शिबिरांमध्ये नागरिकांच्या कुणबी नोंदी शोधण्यासोबतच त्यांनी सादर केलेल्या पुराव्यांची तपासणी केली जाणार आहे. पात्र नागरिकांकडून अर्ज स्वीकारून आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे आतापर्यंत कागदपत्रे, नोंदी किंवा प्रशासकीय प्रक्रियेतील अडचणींमुळे प्रलंबित राहिलेल्या प्रकरणांना गती मिळण्याची शक्यता आहे.

### शिबिराची माहिती आधीच गावागावात पोहोचवावी

शिबिर कुठे आणि कधी होणार, याची माहिती नागरिकांना वेळेत मिळावी यासाठी प्रशासनाला विशेष प्रसिद्धी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यासाठी दवंडी, ग्रामपंचायत कार्यालयातील नोटीस बोर्ड तसेच स्थानिक व्हॉट्सप ग्रुप यांचा वापर करण्याच्या सूचना आहेत. शिबिराची तारीख, वेळ आणि ठिकाण याची माहिती आधीच नागरिकांपर्यंत पोहोचवावी लागणार आहे. त्यामुळे कुणबी नोंदी किंवा संबंधित कागदपत्रे असलेल्या पात्र नागरिकांना या शिबिरांमध्ये सहभागी होऊन आपली प्रकरणे मांडता येणार आहेत. दररोज किती अर्ज आले, किती मंजूर झाले याचा अहवालविशेष मोहिमेवर विभागीय पातळीवरून थेट देखरेख ठेवली जाणार आहे. प्रत्येक शिबिराचा दैनंदिन अहवाल तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या अहवालात एकूण किती अर्ज प्राप्त झाले, त्यापैकी किती अर्ज मंजूर झाले आणि किती प्रकरणे प्रलंबित आहेत, याची माहिती नोंदवावी लागणार आहे. हा अहवाल जिल्ह्यातील नोडल अधिकाऱ्यामार्फत विभागीय आयुक्त कार्यालयाकडे पाठवला जाणार आहे. त्यामुळे मोहिमेची प्रगती आणि प्रमाणपत्र वितरणाची स्थिती प्रशासनाला नियमितपणे तपासता येणार आहे.

दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगरमध्ये सरकारचे शिष्टमंडळ आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची पुन्हा बैठक झाली. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उदय सामंत, मकरंद आबा पाटील, आमदार प्रसाद लाड, तसेच विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा आणि पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणावर तोडगा काढण्यासंदर्भात या बैठकीत चर्चा करण्यात आली. विशेष म्हणजे, गेल्या ३ दिवसांत सरकारचे शिष्टमंडळ आणि अधिकाऱ्यांमध्ये झालेली ही चौथी बैठक असल्याची माहिती समोर आली आहे. बैठकीनंतर चर्चेत झालेले निर्णय आणि सरकारची भूमिका घेऊन अधिकारी किंवा शिष्टमंडळातील सदस्य अंतरवाली सराटीकडे जाण्याची शक्यता आहे.

### ५८ लाख नोंदींच्या पडताळणीला आता अधिक वेग?

मराठा समाजातील पात्र नागरिकांना कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत जुन्या महसुली नोंदींचे महत्त्व मोठे आहे. उपलब्ध जुन्या नोंदी शोधणे आणि त्याआधारे पात्र नागरिकांना प्रमाणपत्र मिळवून देणे हा सध्या मराठा आरक्षणाच्या चर्चेतील महत्त्वाचा मुद्दा आहे. सरकारकडून यापूर्वी मोठ्या प्रमाणावर कुणबी नोंदी उपलब्ध झाल्याचा दावा करण्यात आला आहे. आता मंडळ स्तरावर विशेष शिबिरे आयोजित करण्याचा निर्णय घेतल्यामुळे या नोंदींच्या आधारे पात्र नागरिकांची प्रकरणे पुढे नेण्यास प्रशासनाला अधिक गती मिळण्याची शक्यता आहे.

### जरांगे यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्याचा प्रयत्न

एकीकडे अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन सुरू आहे, तर दुसरीकडे सरकारकडून प्रशासकीय पातळीवर हालचाली वाढल्या आहेत. कुणबी प्रमाणपत्राची प्रक्रिया सुलभ करणे, जुन्या नोंदींची पडताळणी आणि पात्र नागरिकांना प्रमाणपत्र मिळवून देणे या दिशेने प्रशासनाने आता थेट मंडळ पातळीवर यंत्रणा सक्रिय करण्याचा निर्णय घेतला आहे.

दैनिक
# विवेक सिंधु
शुक्रवार, दि.०४ सप्टेंबर २०२६ पान ४

## रस्त्याच्या वादातून दोन जावांमध्ये हाणामारी

### पती-पत्नीवर गुन्हा दाखल



परळी: तालुक्यातील लाडझरी येथे घरासमोरील रस्त्याच्या वादातून दोन जावांमध्ये जोरदार वाद होऊन हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. या वादात मध्यस्थीसाठी आलेल्या सासूच्या डोक्यात फळी मारून डोके फोडल्याप्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात पती आणि पत्नीवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लाडझरी येथील रहिवासी सरस्वती उमाकांत चाटे यांनी घरासमोरील रस्त्याबाबत विचारणा केली असता त्यांची जाऊ लक्ष्मी गौतम चाटे हिने त्यांना उजव्या हातावर मारहाण केली. हा प्रकार पाहून सरस्वती यांची पान ३ वर

## कितर्न हे प्रबोधनाचे प्रभावी माध्यम : ह.भ.प नाना महाराज

बीड (प्रतिनिधी) : कितर्न हे समाज प्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे. प्रत्येक कीर्तनकार हा प्रबोधनकारच असतो. संस्कारित समाज आणि पिढ्या घडवण्याचे काम कीर्तनाच्या माध्यमातून वर्षानुवर्ष होत आहे असे प्रतिपादन श्री संत बंकटस्वामी संस्थानचे ह.भ.प. नाना महाराज कदम यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा पान ३ वर

# ज्येष्ठांचा कायदा २००७ वृद्धापकाळ सन्माननीय जगण्यासाठी आश्वासक : उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे

अंबाजोगाई: ज्येष्ठांनी आयुष्यभर समाज आणि राष्ट्र उभारणीसाठी मोलाचे योगदान दिले असल्याने वृद्धापकाळात भरणपोषण, सुश्रूषा आणि सन्मानाची वागणूक मिळणे हा त्यांचा मूलभूत घटनात्मक तसेच मानवाधिकार आहे, असे प्रतिपादन अंबाजोगाईचे उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांनी केले. ज्येष्ठ नागरिक संघ अंबाजोगाईच्या वतीने आयोजित मासिक बैठकीत ते प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

'आई-वडील आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम २००७' अंतर्गत ज्येष्ठांना संरक्षणाचे अधिकार प्राप्त झाले असून, यासंदर्भातील तक्रार थेट उपजिल्हाधिकारी अथवा जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे दाखल



करता येते. हा कायदा पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरत असल्याने या कायद्याबाबत तरुणांमध्येही व्यापक जनजागृती होणे काळाची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

संपत्तीचे हस्तांतरण करताना ज्येष्ठांनी स्वतःचे अधिकार अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक कायदेशीर दक्षता घ्यावी, तसेच वारसांकडून भरणपोषण, औषधोपचार आणि सन्मानाची लेखी हमी घ्यावी, असा सल्लाही त्यांनी दिला. ग्रामीण भागातील मुले शहरात स्थायिक झाल्याने तेथील ज्येष्ठ एकाकी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि उपेक्षित राहत असून, ज्येष्ठ नागरिक संघाने त्यांच्या समुपदेशनासाठी आणि कल्याणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. अंबाजोगाईत ज्येष्ठांसाठी प्रस्तावित विरंगुळा केंद्रासाठी आवश्यक ते कायदेशीर सहकार्य करण्याची ग्वाहीदेखील पान ३ वर

# २०० वर्षांनंतर कुटुंबात जन्मली लेक

### ९ परळीत रथातून वाजतगाजत लेकीचे भव्य स्वागत; दहिफळे कुटुंबाकडून समाजासमोर नवा आदर्श

परळी: येथील दहिफळे कुटुंबात तब्बल चार पिढ्यांनंतर, म्हणजेच जवळपास दोनशे वर्षांनंतर कन्यारत्न प्राप्त झाले आहे. 'गार्गी' असे नामकरण झालेल्या या चिमुकलीचे रुग्णालयातून घरी येताना ढोल-ताशांच्या गजरात आणि फुलांनी सजवलेल्या भव्य रथातून राजकन्येप्रमाणे स्वागत करण्यात आले. मुलगाच हवा या पारंपरिक मानसिकतेला छेद देत या कुटुंबाने स्त्री जन्माचा मोठा आनंदोत्सव साजरा केला आहे. घरात पाचव्या पिढीत लक्ष्मीच्या पावलांनी मुलगी आल्यामुळे संपूर्ण कुटुंबात आनंदाचे वातावरण पसरले आहे.



गेल्या दोन शतकांपासून घराण्यात एकाही मुलीचा जन्म न झाल्याने कुटुंबाला नेहमीच तिची उणीव भासत होती. चिमुकलीचे आजोबा लिंबाजी दहिफळे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, इतक्या वर्षांनंतर घराण्यात मुलगी आल्यामुळे मनातील रुखरुख संपली असून डोळ्यांत आनंदाश्रू दाटले आहेत. घरात मुलगी असणे हे भाग्याचे लक्षण असून, या लाडक्या लेकीचा सांभाळ फुलासारखा केला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बाळाच्या जन्मानंतर रुग्णालयातच तिच्या जंगी स्वागताची तयारी कुटुंबीयांनी केली होती. या चिमुकलीचे नाव 'गार्गी' असे ठेवण्यात आले असून, तिच्या स्वागतासाठी सजवलेला भव्य रथ रस्त्यावरून जात असताना परळीकरांचे लक्ष वेधून घेत होता. मुलीचे वडील यांनी आनंद व्यक्त करताना म्हटले की, अनेकांना वंशाचा दिवा हवा असतो, मात्र लेकीच्या जन्माचा आनंद अवर्णनीय असतो आणि मुलीचे वडिलांवर विशेष प्रेम असल्याने आपल्याला मुलगीच हवी होती.

स्त्रीभ्रूणहत्येच्या आणि मुलगा-मुलगी भेदभावाच्या पार्श्वभूमीवर दहिफळे कुटुंबाने दाखवलेला हा आनंद समाजाला नवी दिशा देणारा ठरत आहे.

# पावसाअभावी सोयाबीनसह सर्वच पिकांची राखरांगोळी

### धारूर तालुक्यातील ४२ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिके संकटात; शेतकरी हवालदिल

धारूर : तालुक्यात यंदा सुरुवातीला झालेल्या पावसानंतर पावसाने दीर्घ दडी मारल्याने खरीप हंगामातील पिके संकटात सापडली आहेत. सोयाबीन, कापूस, मूग, उडीद यासह सर्वच पिके पावसाअभावी करपू लागली असून अनेक ठिकाणी पिकांची अक्षरशः राखरांगोळी झाली आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.

धारूर तालुक्यात यंदा एकूण ४२ हजार ३१४ हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची



पेरणी करण्यात आली आहे. यामध्ये सर्वाधिक १९ हजार १४३ हेक्टर क्षेत्रावर सोयाबीन, तर १६ हजार ९७१ हेक्टर क्षेत्रावर कापूस पिकाची लागवड करण्यात आली आहे. उर्वरित क्षेत्रात मूग, उडीद तसेच अन्य खरीप पिकांची पेरणी करण्यात आली आहे.

यंदाच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीला जून महिन्यात पावसाने दमदार सुरुवात केली. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची कामे पूर्ण पान ३ वर

# केजच्या सावळेश्वर-आवसगाव रस्त्याची गुणवत्ता नियंत्रण पथकाकडून तपासणी

केज – मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत केज तालुक्यातील राज्य मार्ग क्र. ६४ सावळेश्वर ते आवसगाव इजिमा-१३३ या रस्त्याचे सुधारणा काम हे निकृष्ट दर्जाचे झाल्याचे वृत्त दिव्य मराठीने प्रकाशित केले होते. या वृत्ताची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशावरून गुणवत्ता नियंत्रण पथकाने सदर रस्त्याची प्रत्यक्ष तपासणी केली. दरम्यान,



पथकाच्या अहवालावरून पुढे काय कार्यवाही होणार ? याकडे तक्रारकर्त्यांसह ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

मुख्यमंत्री ग्राम सडक पान ३ वर

# चॉकलेटचे आमिष दाखून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

### मुलीने आरडाओरड केल्याने घटना उघडकीस; आरोपी पोलिसांच्या ताब्यात


पाटोदा – तालुक्यातील नाळवंडी परिसरात अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी अंमळनेर पोलिस ठाण्यात संशयित आरोपी बबन काळे (६२, रा. नाळवंडी, ता. पाटोदा, जि. बीड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १ सप्टेंबर रोजी सायंकाळी चारच्या सुमारास नाळवंडी शिवारातील पंजाब सय्यद यांच्या बाजरीच्या शेतात ही घटना घडली. संशयित आरोपीने अल्पवयीन पीडित मुलीला चॉकलेट खाण्यासाठी वीस रुपये देण्याचे आमिष दाखवले.

आरोपी हा मुलीच्या घरासमोरच राहत असल्याने त्याची आधीपासूनच ओळख असल्याने मुलीने त्याच्यावर विश्वास ठेवला. याचाच गैरफायदा घेत आरोपी काळे याने तिला बाजरीच्या शेतात नेऊन तिच्यावर अत्याचार केला. यावेळी मुलीने मदतीसाठी आरडाओरड केल्याने तिच्या चुलतीने शेताकडे धाव घेतली व तिची सुटका केली. घटनेनंतर आरोपीने तेथून पळ काढत घरात लपून बसला होता. यानंतर संतप्त जमावाने त्याला मारहाण केली. परंतु पोलिसांनी हस्तक्षेप करत त्याला ताब्यात घेतले. पान ३ वर

# सोनवळा गावात मनरेगा योजनेत लाखोंचा डल्ला; कागदावरच रस्ता दाखवून मलिदा लाटणाऱ्यांवर कारवाईचा बडगा

अंबाजोगाई: तालुक्यातील सोनवळा येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) पांदण रस्त्याच्या कामात मोठा भ्रष्टाचार उघडकीस आला आहे. सोनवळा ते नागरगोजे वस्ती या मंजूर रस्त्याचे कोणतेही ठोस काम न करता बोगस मजूर आणि खोटे मस्टर दाखवून सात लाख रुपयांहून अधिक निधीचा अपहार करण्यात आल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी ग्रामस्थांनी पुराव्यांसह तक्रारी करूनही प्रशासकीय पातळीवर सुरुवातीला चालढकल झाली, मात्र आता गटविकास अधिकाऱ्यांनी कठोर पावले उचलत फेरचौकशीचे आदेश दिले असून बोगस कामकाज



करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

ग्रामस्थ सचिन पतंगे आणि किरण पतंगे यांनी शासनाकडे आणि स्थानिक प्रशासनाकडे केलेल्या तक्रारीनुसार, सोनवळा ते नागरगोजे वस्ती या रस्त्याचे २०२२ पासून कोणतेही काम झालेले नाही. असे असतानाही गेल्या वर्षभराच्या काळात या कामावर खोटे मजूर दाखवून सुमारे ६ लाख २९ हजार ते ७ लाख २९ हजार रुपयांचा खर्च दाखविण्यात आला आहे. विशेष म्हणजे, २७ जानेवारी रोजी झालेल्या ग्रामसभेत ग्रामसेवक, सरपंच आणि रोजगार सेवक यांनी ग्रामस्थांसमोर या अपहाराची कबुली दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या रस्त्यासाठी शासनाने तब्बल २४ लाख ९९ हजार रुपयांचा निधी मंजूर केला होता. प्रत्यक्षात केवळ लक्ष्मण पतंगे ते दिलीप पतंगे यांच्या शेतापर्यंत जेमतेम २०० मीटरचे अपूर्ण काम झालेले असताना, आणि नाल्यांचे कोणतेही काम नसताना ५ लाख ९ हजार ७२४ रुपये खर्च झाल्याचे कागदोपत्री दाखवून शासनाची आणि जनतेची घोर फसवणूक करण्यात आली आहे.

या गंभीर प्रकरणात केज मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनीही लक्ष घालत प्रशासनाला कारवाईचे निर्देश दिले होते. पंचायत समितीच्या चौकशी अधिकाऱ्यांनी वारंवार सूचना देऊनही ग्रामरोजगार पान ३ वर

# केजमध्ये बस चढताना दोन महिलांचे ५९ हजाराचे दागिने लंपास

केज – बसमध्ये चढत असलेल्या दोन महिलांचे बॅग व पर्स नगदी पाच हजार रुपये व दागिने असा ५९ हजार रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना केज शहरातील बसस्थानकात घडली.

साळेगाव (ता. केज) येथील सुशिलाबाई मुरलीधर इंगळे (वय ७१) या १ सप्टेंबर रोजी दुपारी १.२० वाजता अंबाजोगाईहून केजच्या बसस्थानकावर उतरल्या. दुपारी १.३५ वाजता गावाकडे जाण्यासाठी केज – कळंब बसमध्ये बसल्या. त्या बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या बॅगमधील १६ हजार रुपयांचे १ तोळ्याचे सोन्याच्या मण्याचे गंठण, १२ हजार रुपयांचे ४ ग्रॅमचे कानातील झुंबर, १० हजार रुपयांची अंगठी, २ हजार रुपये असा ४० हजार रुपयांचा ऐवज काढून घेतला.

त्याचबरोबर हावरगाव (ता. कळंब) येथील रेखा वाल्मीक हजारे (वय ३२) ही महिला त्याच बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समधील १६ हजार रुपये किंमतीचे सहा ग्रॅमचे मण्याचे गंठण व ३ हजार रुपये असा १९ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. सुशिलाबाई इंगळे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक त्रिंबक सोपणे हे तपास करीत आहेत.